# महर्षी स्पर्धा परीक्षा केंद्र, लातूर

खोरी गल्ली पोस्ट ऑफीस जवळ, शामराव पाटील शाळेसमोर, मित्र नगर, लातूर.

मो. : ८५५४०८०९७८, ८९७५२२७५९५



MPSC / STI / PSI / A.S.O., Foundation Batch, D.Ed CET, Bank P.O., Clerk

ग्रामसेवक, तलाठी, पोलीस भरती व इतर विविध स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन केंद्र


# TET शिक्षक पात्रता परीक्षा अभ्यासक्रम

## आराखडा

शिक्षक पात्रता परीक्षा (Teacher Eligibility Test) मध्ये प्राथमिक (इ. 1 ली ते 5 वी) व उच्च प्राथमिक (इ. 6 वी ते 8 वी) या दोन स्तरातील शिक्षकांसाठी प्रत्येकी एक स्वतंत्र प्रश्नपत्रिका राहावी. दोन्ही स्तरासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारास दोन्ही प्रश्नपत्रिका अनिवार्य असतील.

या दोन्ही प्रश्नपत्रिकेचे स्वरूप व काठिण्य पातळी अनुक्रमे माध्यमिक व उच्च माध्यमिक शालेय अभ्यासक्रमावर आधारित राहील.

**प्रश्नपत्रिका आराखडा व स्वरूप :**

**पेपर 1 - (इ. 1 ली ते इ. 5 वी प्राथमिक स्तर)**

**एकुण गुण** : 150

**कालावधी** : 2 तास 30 मिनीटे

| अ.क्र. | विषय (सर्व विषय अनिवार्य) | गुण | प्रश्नसंख्या | प्रश्न स्वरूप |
|---|---|---|---|---|
| 1) | बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र | 30 | 30 | बहुपर्यायी |
| 2) | भाषा - 1 | 30 | 30 | बहुपर्यायी |
| 3) | भाषा - 2 | 30 | 30 | बहुपर्यायी |
| 4) | गणित | 30 | 30 | बहुपर्यायी |
| 5) | परिसर अभ्यास | 30 | 30 | बहुपर्यायी |
| | **एकूण गुण** | **150** | **150** | |




Join Telegram Channel - @maharshilatur

YouTube link - Maharshi MPSC UPSC

**पेपर 2 - (इ. 6 वी ते 8 वी उच्च प्राथमिक स्तर)**

**एकुण गुण :** 150

**कालावधी :** 2 तास 30 मिनीटे

| अ.क्र. | विषय (सर्व विषय अनिवार्य) | गुण | प्रश्नसंख्या | प्रश्न स्वरूप |
|---|---|---|---|---|
| 1) | बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र | 30 | 30 | बहुपर्यायी |
| 2) | भाषा - 1 | 30 | 30 | बहुपर्यायी |
| 3) | भाषा - 2 | 30 | 30 | बहुपर्यायी |
| 4) | गणित व विज्ञान **किंवा** सामाजिक शास्त्रे | 60 | 60 | बहुपर्यायी |
| | **एकूण गुण** | **150** | **150** | |

# पाठ्यक्रम (अभ्यासक्रम)

**पेपर (1) (इ. 1 ली ते इ. 5 वी प्राथमिक स्तर)**

1) भाषा - 1 व 2) भाषा - 2

या परीक्षेसाठी खालील गटाप्रमाणे भाषा - 1 व भाषा - 2 विषय घेता येतील.

| | | | |
|---|---|---|---|
| **भाषा-1 :** मराठी | इंग्रजी | उर्दु | बंगाली / गुजराती / तेलुगू / सिंधी / कन्नड / हिंदी |
| **भाषा-2 :** इंग्रजी | मराठी | मराठी किंवा इंग्रजी | मराठी किंवा इंग्रजी |

इ. 1 ली ते 5 वी असलेला अभ्यासक्रमातील पाठ्यक्रम राहील.

**3) बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र :-**

या विषयाच्या अनुषंगाने विचारण्यात येणारे प्रश्न हे शैक्षणिक मानसशास्त्र यासंबंधी व 6 ते 11 वर्षे वयोगटाच्या विद्यार्थ्यांच्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेसंबंधी असतील. याच बरोबर विशेष गरजा असणारी बालक, त्यांची गुणवैशिष्ट्ये, शालेय आंतरक्रिया, उत्तम शिक्षकाची गुणवैशिष्ट्ये यांच्यावर आधारीत प्रश्नांचाही सामावेश असेल. तसेच विविध विषयांच्या अध्यापन पध्दती, मूल्यमापन पध्दती यावर आधारीत प्रश्नांचा समावेश राहील.

या विषयासाठी अध्यापन शिक्षण पदविका अभ्यासक्रमावर आधारीत सध्या राज्यात सुरु असलेला विहित पाठ्यक्रम लागू राहील.



**Join Telegram Channel - @maharshilatur**
**YouTube link - Maharshi MPSC UPSC**

**4) गणित :-**

गणित विषयाशी संबंधित प्रश्न हे गणितातील मुलभूत संबोध, तार्किकता, समस्या निराकरण व गणित विषयाचे अध्यापनशास्त्रीय ज्ञान या मुद्द्यांवर आधारीत असतील.

गणित विषयाची व्याप्ती इ. 1 ली ते इ. 5 वी च्या प्रचलित अभ्यासक्रमावरील असेल.

**5) परिसर अभ्यास :-**

परिसर अभ्यास विषयाशी संबंधित प्रश्न हे इतिहास, नागरिकशास्त्र, भूगोल, सामान्य विज्ञान, पर्यावरण या विषयातील मुलभूत संबोध व या विषयाचे अध्यापनशास्त्रीय ज्ञान या मुद्द्यांवर आधारीत असतील.

परिसर अभ्यासाची व्याप्ती इ. 1 ली ते 5 वी च्या प्रचलित अभ्यासक्रमानुसार असेल. मात्र पुनर्रचित प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम-2012 मध्ये इ. 1 ली व इ. 2 री ला स्वतंत्रपणे परिसर अभ्यास हा विषय नाही. परिसर अभ्यास हा विषय प्रथम भाषा व गणित या विषयामध्ये एकात्मिक पध्दतीने समाविष्ट कलेला आहे. इ 3 री ते इ. 5 वी चा प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम 2004 मधील इतिहास, नागरिकशास्त्र, भूगोल, सामान्य विज्ञान या विषयांचा पाठ्यक्रम लागू राहील.

**काठिण्य पातळी :-** वरील सर्व विषयांच्या इयत्ता 1 ली ते 5 वी च्या अभ्यासक्रमातील घटकावर, माध्यमिक शालांत परीक्षेच्या काठिण्य पातळीचे प्रश्न असतील.

**संदर्भ :-**

1) प्रचलित प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम व पाठ्यक्रम.

2) प्रचलित अध्यापक शिक्षण पदविका अभ्यासक्रम व पाठ्यक्रम.

3) संबंधित विषयांची राज्य शासनाची विहित केलेली प्रचलित इ. 1 ली ते 10 वी ची पाठ्यपुस्तक.

**पेपर(2) (इ. 6 वी ते 8 वी उच्च प्राथमिक स्तर)**

1) भाषा - 1 व 2) भाषा - 2

**पाठ्यक्रमाची (Syllabus) व्याप्ती :-**

या परीक्षेसाठी खालील गटाप्रमाणे भाषा - 1 व भाषा - 2 विषय घेता येतील.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **भाषा-1 :** | मराठी | इंग्रजी | उर्दु | बंगाली / गुजराती / तेलुगू / सिंधी / कन्नड / हिंदी |
| **भाषा-2 :** | इंग्रजी | मराठी | मराठी किंवा इंग्रजी | मराठी किंवा इंग्रजी |

इ. 6 वी ते 8 वी प्रचलित प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रमामधील संबंधित भाषेचा पाठ्यक्रम लागू राहील.



**Join Telegram Channel - @maharshilatur**
**YouTube link - Maharshi MPSC UPSC**

**3) बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र :-**

या विषयाच्या अनुषंगाने विचारण्यात येणारे प्रश्न हे शैक्षणिक मानसशास्त्र यासंबंधी व 11 ते 14 वर्ष वयोगटाच्या विद्यार्थ्यांच्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेसंबंधी असतील. याच बरोबर विशेष गरजा असणारी बालक, त्यांची गुणवैशिष्ट्ये, शालेय आंतरक्रिया, उत्तम शिक्षकाची गुणवैशिष्ट्ये यांच्यावर आधारीत प्रश्नांचाही समावेश राहील. तसेच विविध विषयांच्या अध्यापन पध्दती, मूल्यमापन पध्दती यावर आधारीत प्रश्नांचा समावेश राहील.

या विषयासाठी प्रचलित अध्यापक शिक्षण पदविका अभ्यासक्रम व 11 ते 14 वयोगटाशी सबंधित प्रचलित बी. एड. अभ्यासक्रमातील भाग या अभ्यासक्रमावर आधारीत विहित क्लेला व सध्या राज्यात सुरु असलेला पाठ्यक्रम लागू राहील.

**4 अ) गणित व विज्ञान विषय गट :-**

गणित व विज्ञान विषय गटासाठी एकूण 60 गुण असून त्यापैकी 30 गुण गणितासाठी व 30 गुण विज्ञानासाठी राहतील. या विषय स्तरातील प्रश्न हे विज्ञान व गणितातील मुलभूत संबोध, समस्या निराकरण क्षमता, गणित व विज्ञानाचे अध्यापन शास्त्रीय ज्ञान या संबधीचे असतील.

प्रचलित प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रमामधील संबंधित विषयाचा इयत्ता 6 वी ते 8 वी चा पाठ्यक्रम लागू राहील.

**4 ब) सामाजिक शास्त्रे विषय गट :-**

सामाजिक शास्त्रासाठी एकूण 60 गुणांचे प्रश्न असतील. सदर प्रश्न हे सामाजिक शास्त्रातील संकल्पना, आशय व अध्यापनशास्त्रीय ज्ञानासंबंधी असतील.

प्रचलित प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम इ. 6 वी ते 8 वी च्या अभ्यासक्रमावर आधारीत संबंधित विषयाचा पाठ्यक्रम लागू राहील.

**काठिण्य पातळी :-** वरील सर्व विषयांच्या इयत्ता 6 वी ते 8 वी चे अभ्यासक्रमातील घटकावर, उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या काठिण्य पातळीचे प्रश्न असतील.

**संदर्भ :-**

1) प्रचलित प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम इ. 6 वी ते 8 वी व पाठ्यक्रम.

2) प्रचलित अध्यापक शिक्षण पदविका अभ्यासक्रम व पाठ्यक्रम.

3) प्रचलित संबंधित विषयांची राज्य शासनाने विहित केलेली प्रचलित इ. 1 ली वी ते 12 वी ची पाठ्यपुस्तक.

4) प्रचलित बी.एड्. अभ्यासक्रम व पाठ्यक्रम.



**Join Telegram Channel - @maharshilatur**
**YouTube link - Maharshi MPSC UPSC**